नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार, दि. १२ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# शक्तीपीठ महामार्गाच्या परिसरात अशोक खरातची जागा

## व्यवहाराची किंमत २ कोटींच्या घरात; सोलापुरात ११ एकरांहून अधिक जमीन

**नाशिक : (स. गांवकरी)**

भोंदूबाबा अशोक एकनाथ खरात याने पुणे, शिर्डी आणि नाशिकसारख्या मोठ्या शहरांनंतर आता सोलापुरातही कोट्यवधी रुपयांची मालमत्ता खरेदी केल्याचे तपासातून समोर आले आहे. अशोक खरातने उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावातील गट क्रमांक 200/1 मधील 4.48 हेक्टर म्हणजेच सुमारे 11 एकरांहून अधिक जमीन स्वतःच्या नावावर खरेदी केली असून, या नवीन खुलाशामुळे त्याच्या बेनामी संपत्तीचे धागेदोरे आता सोलापूरपर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे. 28 मार्च 2024 रोजी नोंदणी झालेल्या या व्यवहाराची किंमत 2 कोटी 40 लाख 91 हजार 200 रुपये असून, यामध्ये अशोक खरातची पत्नी कल्पना खरात हिला कुलमुखत्यार म्हणून अधिकार देण्यात आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावातून शक्तीपीठ महामार्ग जाणार असल्याने, जिथे जमिनीचे बाजारभाव साधारण 5 ते 6 लाख रुपये प्रति एकर आहेत, तिथे खरातने तब्बल 21 ते 22 लाख रुपये प्रति एकर या चढ्या दराने ही जमीन खरेदी केल्याचे खरेदीखतातील नोंदीवरून स्पष्ट झाले आहे.

या संदर्भात अधिकची माहिती अशी की, उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण हद्दीत पत्नीच्या नावे जमीन खरेदी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नियोजित शक्तीपीठ महामार्ग कळमण हद्दीतून जाणार असल्याची माहिती मिळाल्याने अशोक खरातने ही जमीन खरेदी केली असल्याची शक्यता आहे. अशोक खरातच्या अटकेनंतर आता त्याची पत्नी कल्पना खरात हिचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथकाने कंबर कसली आहे. शिर्डी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यापासून कल्पना नाशिकमधील आपल्या राहत्या घरातून फरार झाली असून, 10 दिवस उलटूनही पोलिसांच्या हाती कोणताही ठोस पुरावा लागलेला नाही.

कल्पना खरातचा माग काढण्यासाठी तपास यंत्रणेने आता तिचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि घरगुती नोकरांकडे आपला मोर्चा वळवला आहे. एसआयटीच्या पथकाने नाशिकमधील तिच्या काही जवळच्या मैत्रिणींसह आत्ताच्या व जुन्या नोकरांचीही चौकशी सुरू केली असून, ती नेमकी कोणाच्या संपर्कात आहे आणि तिने कुठे आश्रय घेतला असावा, या दिशेने पोलिसांचा कसून तपास सुरू आहे.



### खरात अधिकच कोंडीत सापडला

एकूणच, अशोक खरात प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून, त्याच्याविरोधातील पुरावे वाढत आहेत. एसआयटीकडून सुरू असलेल्या तपासामुळे त्याच्या अडचणी वाढत चालल्या आहेत. मानसिक तणाव आणि वाढते गुन्हे यामुळे खरात अधिकच कोंडीत सापडला आहे. येत्या काही दिवसांत या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### फोन कॉल्समधे शिजुका आणि नॉडी ही नावं

भोंदू अशोक खरातचं प्रकरण सध्या चांगलंच चर्चेत आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अशोक खरातचा सीडीआर समोर आणला. रुपाली चाकणकर यांनी त्याला १७७ कॉल्स केल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १७ कॉल्स केल्याचाही दावा केला आहे. आता अंजली दमानियांनी या प्रकरणात शिजुका आणि नॉडी या कार्टून कॅरेक्टर्सची नावं घेत मोठा दावा केला आहे. या नावाने काही नंबर मास्क करण्यात आले आहेत. तसंच शिजुका नॉडीचे सर्वाधिक कॉल्स या अशोक खरातला गेल्याचं दिसतंय.









# थोडक्यात पण महत्वाचे

## अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीनी १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती केली जाहीर



पुणे (स. गांवकरी) : अनंत नॅशनल युनिव्हर्सिटी नी रँक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष शिष्यवृत्ती योजना जाहीर केली आहे. एआर २५० पर्यंत रँक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना १०० टक्क्यांपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाईल. या अंतर्गत विद्यार्थ्यांची पूर्ण ट्युशन फी आणि होस्टेल फी माफ केली जाईल. तसेच एआर २५०० पर्यंत रँक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची व्यवस्था ठेवण्यात आली आहे, ज्यामुळे अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळू शकेल. याशिवाय यूसीईईडी पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत आणखी एक मोठी सोय मिळणार आहे. त्यांना एडीईपीटी प्रवेश परीक्षा देण्याची गरज राहणार नाही आणि थेट मुलाखतीची संधी दिली जाईल. हा मार्ग विद्यार्थ्यांच्या यूसीईईडी मधील मेहनत आणि गुणवत्तेची दखल घेत तयार करण्यात आला आहे. यामुळे डिझाईन क्षेत्रात क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अधिक सोपी आणि स्पष्ट संधी उपलब्ध होईल. अशी विशिष्ट योजना विद्यापीठाच्या व्यापक ध्येयाचा भाग आहे ज्यामध्ये आर्थिक परिस्थिती कोणतीही असली तरी प्रतिभावान विद्यार्थ्यांना दर्जेदार डिझाईन शिक्षण मिळावे, यावर भार दिला जातो. गुणवत्ताधारित शिष्यवृत्तीबरोबरच विद्यापीठाकडून गरजेनुसार आर्थिक मदतही दिली जाते. यात अंशतः ते पूर्ण ट्युशन फी माफीपर्यंत मदत दिली जाऊ शकते. ही मदत विद्यापीठाच्या आर्थिक सहाय्य समिती द्वारे विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती जशी की उत्पन्न, बचत, गुंतवणूक आणि शिक्षण कर्ज यांचा विचार करून ठरवली गेली जाते.

## जात वैधता प्रमाणपत्र त्रुटी पूर्ततेसाठी ११ व १३ एप्रिलला शिबिराचे आयोजन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अहिल्यानगर यांच्या वतीने दि. ११ व १३ एप्रिल २०२६ रोजी त्रुटी पूर्तता शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, अर्जातील त्रुटी दूर करण्यासाठी अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत समिती कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्षा व अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रेश्मा माळी, उपायुक्त राकेश पाटील व सदस्य सचिव अनिल तिदमे यांनी केले आहे. सामाजिक समता सप्ताहातील विशेष उपक्रमांतर्गत हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. समितीकडे सादर झालेल्या व तांत्रिक त्रुटींमुळे प्रलंबित असलेल्या प्रकरणांतील अर्जदारांना यामधून संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाइन प्रणालीद्वारे त्रुटी कळवूनही अद्याप पूर्तता न केलेल्या अर्जदारांसाठी ही अंतिम संधी मानली जात आहे. इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आपले प्रस्ताव ऑनलाइन सादर करून आवश्यक कागदपत्रांच्या प्रती समितीच्या नागरी सुविधा केंद्रात तात्काळ जमा कराव्यात, यामुळे जून-जुलै महिन्यात प्रवेशावेळी जात वैधता प्रमाणपत्रासाठी होणारी धावपळ टाळता येणार आहे. अर्ज प्रक्रियेदरम्यान त्रयस्थ व्यक्तींवर अवलंबून राहू नये, तसेच अर्ज भरताना स्वतःचा किंवा पालकांचा अचूक ई-मेल आयडी व दूरध्वनी क्रमांक नमूद करावा, शपथपत्रातील वंशावळ संबंधित अधिकृत कागदपत्रांच्या आधारेच तयार करावी, असे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## ‘इंद्रिया’चे नवे स्टोअर; पुण्यातील उपस्थिती अधिक मजबूत



पुणे (स. गांवकरी) : आदित्य बिर्ला ज्वेलरीच्या ‘इंद्रिया’ या ब्रँडने पुण्यातील विमाननगर येथील फिनिक्स मार्केटसिटीमध्ये नवीन स्टोअर सुरू करत शहरातील आपली उपस्थिती अधिक बळकट केली आहे. हे पुण्यातील ब्रँडचे चौथे स्टोअर असून, महाराष्ट्रातील विस्ताराच्या धोरणाला गती देणारा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. पूर्व पुण्यातील प्रमुख रिटेल आणि लाइफस्टाइल हब असलेल्या फिनिक्स मार्केटसिटीमध्ये उभारण्यात आलेले हे स्टोअर आधुनिक आणि आकर्षक खरेदी अनुभव देण्यासाठी खास डिझाइन करण्यात आले आहे. या स्टोअरमध्ये ३२ हजारांहून अधिक दागिन्यांचे डिझाइन्स उपलब्ध असून, वधू-अलंकार, सण-उत्सवांसाठीचे दागिने, समकालीन कलेक्शन तसेच दैनंदिन वापरासाठी हलक्या वजनाचे दागिने यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या स्टोअरमध्ये कारीगरी रूमची सुविधा देण्यात आली आहे. यामुळे ग्राहकांना दागिन्यांच्या निर्मिती प्रक्रियेचा जवळून अनुभव घेता येणार असून, वैयक्तिक सहभागातून खास दागिने तयार करण्याची संधीही मिळणार आहे. ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन डिझाइन, वैविध्य आणि उत्कृष्ट सेवा यांवर लक्ष केंद्रित करत हे स्टोअर उभारण्यात आले आहे. या विस्तारामुळे पश्चिम भारतातील प्रीमियम ज्वेलरी क्षेत्रात ‘इंद्रिया’ची उपस्थिती आणखी मजबूत होणार आहे. यावेळी इंद्रियाचे सीईओ संदीप कोहली म्हणाले, “पुणे ही आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ आहे. येथे विविध ग्राहकवर्ग असून, डिझाइन-आधारित दागिन्यांची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. शहरातील चौथ्या स्टोअरद्वारे अधिकाधिक ग्राहकांना उच्च दर्जाचा खरेदी अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे.”

# आमदार रोहित पवारांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## मोहरी धरणाच्या दुरुस्तीसाठी 'धरण सुरक्षा समिती' सोमवारी मोहरी येथे मध्ये येणार

जामखेड तालुका : (स. गांवकरी)



जामखेड तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या मोहरी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या दुरुस्तीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आमदार रोहित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासनाला जाग आली असून, येत्या सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी 'धरण सुरक्षा आढावा समिती' मोहरी धरणाची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे आश्वासन महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.

मोहरी धरणाच्या भिंतीला पडलेले भगदाड आणि सांडव्याची झालेली दुरवस्था याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विजयसिंह गोलेकर यांनी आमदार रोहित पवार यांना निवेदन दिले होते. पवार यांनी तातडीने कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत धुमाळ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून पत्राद्वारे तातडीच्या कार्यवाहीची मागणी केली. यानंतर जलसंपदा विभागाच्या कृष्णा खोरे प्रकल्पाचे मुख्य अभियंता संजीव चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

सोमवारी येणारी ही उच्चस्तरीय तांत्रिक समिती धरणातील गळती, माती भराव, सांडव्याची दुरवस्था आणि कालव्यांची पाहणी करेल. धरणाची सुरक्षा मानके ठरवणे, आपत्कालीन योजना आखणे आणि धरणाखालील गावांचे संरक्षण करणे ही या समितीची मुख्य जबाबदारी आहे. या समितीच्या अहवालानंतर तातडीने मजबुतीकरणाच्या कामाला सुरुवात होणार आहे.

गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे भगदाड पडले असता आमदार रोहित पवार यांनी स्वखर्चाने आवश्यक मशिनरी, जेसीबी लावून काम सुरू केले होते. मात्र, सत्ताधाऱ्यांनी तांत्रिक कारणे पुढे करत आणि श्रेयवादापोटी हे काम

### का महत्त्वाचे आहे मोहरी धरण?

- १० गावांना आधार: खर्डा या मोठ्या गावासह परिसरातील १० गावांची तहान या धरणावर अवलंबून आहे.
- दुष्काळातील 'तारणहार': संपूर्ण तालुक्याला टँकरमुक्त करण्यासाठी मोहरी तलावाचा पाणीसाठा अत्यंत महत्त्वाचा ठरतो.
- शेतीला संजीवनी: तेलंगशी, जायभायवाडी, मोहरी, खर्डा, गवळवाडी, पांढरेवाडी परिसरातील शेती या प्रकल्पावर अवलंबून आहे.

थांबवल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. "स्वतः काही करायचे नाही आणि दुसरा करत असेल तर खोडा घालायचा, या वृत्तीमुळे पाणी वाया गेले आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले," अशी टीका विजयसिंह गोलेकर यांनी केली आहे. मोहरी धरणाची सुरक्षा हा हजारो ग्रामस्थांच्या जीवनाचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न आहे. प्रशासनाने आता कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष कामाला वेग द्यावा. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण न झाल्यास ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागेल अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांनी दिली आहे.

# पुणे फोटोग्राफर्स असोसिएशनचा ‘फोटो फेअर’ उत्साहात संपन्न



पुणे : (स. गांवकरी)

पुणे फोटोग्राफर्स अँड व्हिडिओग्राफर्स असोसिएशनच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित ‘फोटो फेअर’ आणि ‘विशेष गौरव सोहळा’ पुण्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रदर्शनातून फोटोग्राफी क्षेत्रातील जागतिक स्तरावरील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव पुणेकर फोटोग्राफर्सना एकाच छताखाली घेता आला.

प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवर कांजी भाई आणि सोनीचे अभिजीत यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या फेअरमध्ये निकॉन, कॅनन, लुमिक्स, फ्युजी, एचपी, डिजिटेक आणि गोडॉक्स यांसारख्या नामांकित ब्रँड्ससह फोटो लॅब व कॅमेरा उपकरणांचे एकूण १८ स्टॉल्स उभारण्यात आले होते. पुण्यातील ६०० हून अधिक फोटोग्राफर्सनी प्रदर्शनाला भेट देत नवीन कॅमेरे, लेन्सेस आणि लाइटिंग तंत्रज्ञानाची माहिती घेतली. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे कॅमेरा रिपेअर तज्ज्ञांचा विशेष सत्कार. “ज्याप्रमाणे डॉक्टर मानवी शरीराची काळजी घेतात, त्याचप्रमाणे फोटोग्राफरच्या कॅमेऱ्याला जीवदान देण्याचे काम रिपेअरिंग तज्ज्ञ करतात,” अशा शब्दांत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

# समर्या क्रिएशनकडून ‘औमोरा म्यूझिक’ची दमदार एंट्री

## समीर अंजान संस्थापक भागीदार

मुंबई : (स. गांवकरी)

भारतातील क्रिएटर इकॉनमीने संगीत क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत समर्या क्रिएशनने ‘औमोरा म्यूझिक’ या नव्या म्यूझिक लेबलचे भव्य लॉन्च अंधेरी वेस्ट येथील ‘द क्लब’मध्ये केले. या लेबलचे संस्थापक भागीदार म्हणून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डधारक ज्येष्ठ गीतकार समीर अंजान यांची साथ लाभली आहे. ‘औमोरा म्यूझिक’ हे केवळ एक म्यूझिक लेबल नसून, कलाकार-केंद्रित (क्रिएटर-फर्स्ट) संकल्पनेवर आधारित एक नवे व्यासपीठ आहे. पारंपरिक अल्गोरिदम-आधारित ट्रेंड्सऐवजी कलाकारांच्या सर्जनशीलतेला प्राधान्य देत संगीत कसे असावे हे कलाकारच ठरवतील, हा या लेबलचा मुख्य उद्देश आहे.

चार दशकांच्या कारकिर्दीत ६४०हून अधिक हिंदी चित्रपटांसाठी ४,००० पेक्षा जास्त गाणी लिहिणारे समीर अंजान हे या प्रकल्पात केवळ ब्रँड चेहरा नसून थेट निर्माते म्हणून सहभागी झाले आहेत. “औमोरा म्यूझिक म्हणजे खऱ्या अर्थाने काही सांगायचे आहे अशा कलाकारांचे घर आहे,” असे त्यांनी सांगितले.

सध्या औमोरा म्यूझिक १५० पेक्षा अधिक डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर १९ ट्रॅक्ससह सक्रिय असून, पुढील काळात १५० हून अधिक ओरिजिनल गाण्यांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. यात बॉलीवूड, भक्ती, लोकसंगीत, बालगीते, रॅप आणि कंटेम्पोरेरी पॉप अशा विविध प्रकारांचा समावेश असेल.

या लेबलच्या क्रिएटिव्ह टीममध्ये संगीतकार नील गांधी आणि निरज विश्वकर्मा यांचा समावेश आहे. त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रातून संगीताकडे वाटचाल करत नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणला आहे. औमोरा म्यूझिकचा पहिला प्रमुख



कलाकार ‘Jaexellejay’ (अजय) आहे. एकेकाळी फूड डिलिव्हरीचे काम करणाऱ्या अजयने स्वतःच्या प्रयत्नांतून २२ गाणी तयार केली असून, सामाजिक वास्तवावर आधारित त्याची शैली विशेष ठरली आहे. आता तो समीर अंजान यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील प्रवास करणार आहे. लेबलने २०२६ ते २०३२ या कालावधीसाठी महत्त्वाकांक्षी रोडमॅप जाहीर केला आहे. यात म्यूझिक पब्लिशिंग व लायसन्सिंग, लाइव्ह परफॉर्मन्स आणि आर्टिस्ट डेव्हलपमेंट या तीन प्रमुख स्तंभांवर भर देण्यात आला आहे. २०२८ पर्यंत ५०० पेक्षा अधिक ओरिजिनल गाणी, ८ महानगरांमध्ये संगीत दौरे तसेच UAE, UK आणि उत्तर अमेरिकेत कॉन्सर्ट आयोजित करण्याचे नियोजन आहे. समर्या क्रिएशनचे व्यवस्थापकीय संचालक मनोज अग्रवाल यांनी सांगितले की, “आम्ही केवळ संगीत क्षेत्रात भर घालण्यासाठी नाही, तर भारतीय संगीताची दिशा बदलण्यासाठी आलो आहोत.”

# नेवासा फाटा येथे महात्मा फुले जयंती साजरी



नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा फाटा येथील शिव महाराणा प्रताप चौकात आज महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि जोशपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. लोकनियुक्त सरपंच सतीश दादा नीपुंगे पाटील, पोलीस पाटील आदेश साठे, भारत भाऊ डोकडे (माजी नगरसेवक), महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे, युवा नेते सचिन परदेशी, दैनिक लोक परिवर्तन चे संपादक आबासाहेब शिरसाठ, माऊली वाघुले,इंगळे पाटील, अक्षय शिंदे, गणेश व्यवहारे, कृष्णा नेमाने, जालिंदर खंडागळे, अमोल साळवे, हरुण भाई शेख तसेच इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन, आयोजन आणि यशस्वी अंमलबजावणीमध्ये बादल परदेशी व कृष्णा नेमाने यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. त्यांच्या पुढाकारामुळे युवक मोठ्या संख्येने एकत्र आले आणि कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांनी केवळ कार्यक्रमाचे नेतृत्वच केले नाही, तर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभावी प्रचार करत सामाजिक बांधिलकीची जाणीवही निर्माण केली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी “जय ज्योतिबा!”, व समस्त महापुरुषांच्या नावाने घोषणा देण्यात आल्या व“समता हवीच!” अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. तसेच या कार्यक्रमाप्रसंगी पोलीस पाटील आदेश साठे यांनी ज्योतिबा फुले यांचे विचार मांडून उपस्थितांना मार्गदर्शन केले ,तसेच गणेश झगरे पाटील यांनी समतेचा संदेश देऊन आपले मनोगत व्यक्त केले,व बादल परदेशी यांनी ज्योतिबा फुले यांचे विचार मांडून स्त्रीशक्तीचा जागर करणारे समाज सुधारक ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती देऊन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या कार्यक्रमातून सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार आणि अन्यायाविरुद्ध लढा देण्याचा ठाम संदेश देण्यात आला. बादल परदेशी यांच्या नेतृत्वामुळे हा कार्यक्रम केवळ जयंतीपुरता मर्यादित न राहता सामाजिक जागृतीचा प्रभावी मंच ठरला.

# पाळीव प्राण्यांवरील खर्चात वाढ; ‘पेट पेरेंट्स’ संस्कृतीला वेग

(स. गांवकरी)

भारतात पाळीव प्राण्यांना कुटुंबातील सदस्यांप्रमाणे स्थान दिले जात असून त्यांच्या संगोपनावर होणारा खर्च झपाट्याने वाढत आहे. जनरेशन झेड आणि मिलेनियल्सच्या पुढाकारामुळे पाळीव प्राण्यांच्या काळजीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असून, फ्लिपकार्टवरील पेट केअर श्रेणीत वार्षिक ५० टक्क्यांहून अधिक वाढ नोंदविण्यात आली आहे. आयबीईएफ (IBEF) च्या अहवालानुसार, वाढते खर्च करण्यायोग्य उत्पन्न, शहरी जीवनशैली आणि पाळीव प्राण्यांच्या आरोग्याविषयी वाढलेली जागरूकता यामुळे भारतातील पेट केअर उद्योग सुमारे २० टक्क्यांच्या वार्षिक दराने वाढत आहे. कुत्रे व मांजरींसह मासे, पक्षी आणि इतर पाळीव प्राण्यांसाठी ग्राहक दैनंदिन गरजांच्या वस्तूंबरोबरच प्रीमियम आणि विशेष उत्पादनांचीही खरेदी करत आहेत. फ्लिपकार्टवरील एकूण मागणीपैकी ८० टक्क्यांहून अधिक वाटा जनरेशन झेड आणि मिलेनियल्सचा आहे. बेंगळुरू, दिल्ली आणि कोलकाता ही शहरे प्रमुख मागणी केंद्रे म्हणून उदयास आली असून, एकूण ऑर्डर्समध्ये त्यांचा सुमारे १० टक्के वाटा आहे. त्याचबरोबर मैसूर, देहरादून आणि कटक यांसारख्या बिगर-मेट्रो शहरांमध्येही पाळीव प्राणी पाळण्याचे प्रमाण वाढत असल्याने या क्षेत्रात सातत्यपूर्ण वाढ दिसून येत आहे. पाळीव प्राण्यांसाठीची खरेदी आता केवळ अन्न व स्वच्छतेपुरती मर्यादित न राहता पोषण, ग्रूमिंग, आरोग्य आणि मानसिक विकासापर्यंत विस्तारली आहे. क्लीन-लेबल, विशिष्ट जातींनुसार आणि पोषकतत्त्वांनी समृद्ध अन्नाच्या मागणीत ४० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. तसेच, ग्रूमिंग साहित्य, ट्रिमर्स, हेल्थ सप्लिमेंट्स आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा यांनाही मोठी मागणी आहे.

# समतेचा जागर! सावेडीत महात्मा फुले जयंतीनिमित्त वैचारिक अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात

## “तरुणांनी सत्यशोधक विचारांनी समाजपरिवर्तनाची मशाल हाती घ्यावी” – गणेश राऊत

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त सावेडी उपनगरात वंचित बहुजन आघाडी प्रणित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार युवा मंचाच्या वतीने गुलमोहोर रोड चौक येथे वैचारिक अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी सामाजिक समतेचा संदेश देत विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महात्मा फुले यांनी दिलेला समतेचा विचार हा केवळ तत्त्वज्ञान नसून शोषित-वंचितांच्या मुक्तीचा मार्ग आहे. “आजच्या काळात फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांना आचरणात आणणे, हाच खरा उत्सव आहे,”असे ते म्हणाले. समाजातील विषमता दूर करण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. योगेश साठे पुढे म्हणाले की, युवकांनी केवळ कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनासाठी सातत्याने कार्य करावे. शिक्षण, समता आणि बंधुता या मूल्यांचा प्रसार करताना प्रत्येकाने जबाबदारीने पुढे यावे. सावेडी परिसरात वैचारिक चळवळ अधिक बळकट करण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी युवा मंचाच्या वतीने



सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. पारंपारिक सण साजरे करण्यापेक्षा समाजात प्रबोधनाची जागृती करणे ही काळाची गरज असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले. “आम्ही केवळ जयंती साजरी करत नाही, तर अज्ञानाविरुद्ध लढा उभारतो,” असा निर्धार युवा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी गणेश राऊत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महात्मा फुलेंनी दिलेली सत्यशोधक वृत्ती ही आजच्या तरुणांसाठी दिशादर्शक ठरते. शिक्षण, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढे येणे अत्यावश्यक आहे. समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि विषमता दूर करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःपासून परिवर्तनाची सुरुवात करावी, असे त्यांनी आवाहन केले. पुढे बोलताना श्री.राऊत म्हणाले की, फुले - आंबेडकरांच्या विचारांमुळेच वंचित समाजाला स्वतःची ओळख मिळाली. आजही अनेक स्तरांवर विषमता दिसून येते, त्यामुळे या विचारांची गरज अधिक तीव्र झाली आहे. तरुणांनी केवळ सोशल मीडियापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष समाजात उतरून काम करावे, संघटित शक्ती निर्माण करावी आणि सामाजिक न्यायासाठी झटावे,असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप यादव, गोविंद खुराना, सुधीर ठोंबे, अ‍ॅड. लक्ष्मीकांत पठारे, प्रतीक साठे, देविदास भालेराव, प्रतीक जाधव, अंकुश माळसमिंदर, समिंदर, किरण चव्हाण, रविराज गायकवाड, ज्ञानेश्वर दळवी, संतोष शेळके साहिल उबले,प्रज्योत शिर्के, संतोष पवार, प्रशांत शिंदे, संदेश रणदिवे, प्रसाद चव्हाण, राजू शिंदे, गुलाब सकट, भरत दिघे, पंकज पवार, आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार युवा मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सावेडी परिसरात या उपक्रमामुळे सामाजिक जागृतीची लाट निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.



रील स्टार विनायक माळी यांना दैनिक समर्थ गावकरी समूहाकडून दैनिक समर्थ गावकरी 2026 ची डायरी तसेच दैनिक समर्थ गावकरीची प्रत किचन आणि पेन देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला यावेळी दैनिक समर्थ गावकरी मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे, आणि क्राईम रिपोर्टर महेश जाधव उपस्थित होते.

# भव्य लक्ष्मी नारायण प्रवेशद्वाराचे लोकार्पण





शिवनेरी : (स. गांवकरी)

स्व. नारायण अर्जुन थोरात यांच्या स्मरणार्थ तिर्थक्षेत्र उभारलेल्या 'लक्ष्मी नारायण' या भव्य प्रवेशद्वाराचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या शुभ हस्ते ऑनलाईन करण्यात आले. यावेळी प्रचंड जनसमुदायांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले .ज्येष्ठ शिवसैनिक स्व. नारायण थोरात यांचे संस्कार व आदर्श प्रेरणादायी ठरतील असे गौरव उद्गार याप्रसंगी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काढले.

शिरोली खुर्द येथील शिवसेना उपनेते बबन थोरात यांचे वडील स्व.नारायण अर्जुन थोरात यांचा प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला जुन्नर तालुक्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या मान्यवरांनी प्रतिमापूजन करून अभिवादन केले. अयोध्या येथे श्रीरामलल्ला गर्भगृहात कीर्तन करणारे एकमेव कीर्तनकार, जगदगुरु श्री तुकोबाराय विश्व कल्याण मिशनचे संस्थापक, जगदगुरुकृपांकित डॉ. चेतनानंद पुणेकर यांची कीर्तनरुपी भक्तिमय सेवा संपन्न झाली.

यावेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी स्व. नारायण थोरात यांच्या सामाजिक कार्याची,गावच्या विकासात्मक योगदानाची,शेती आणि कौटुंबिक जबाबदारीतील अनेक आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमानिमित्त शिरोली खुर्द गावातील वय वर्ष ७० पुढील जेष्ठ नागरिकांचा थोरात परिवाराच्या वतीने पाद्यपूजन व पोशाख देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी खासदार डॉ.अमोल कोल्हे, खासदार नागेश पाटील, आमदार शरद सोनवणे, आमदार डॉ.मंजुळा गावित, पुणे जिल्हा समन्वयक संभाजी तांबे. सहसपर्कप्रमुख विनायक भिसे , जिल्हाप्रमुख संदेश देशमुख,अजय सावंत,जिल्हा संघटक बाळा मगर, जिल्हा संपर्कप्रमुख भुजंग पाटील, प्रकाश मारावर, मनोज यादव,उपजिल्हाप्रमुख महेश पाटील,सतीश उमरेकर,बालाजी कल्याणकर,उपजिल्हा संघटक शंकर घुगे, माजी अध्यक्ष जगन कवडे, जि प स गुलाब पारखे व छाया तांबे, सभापती कमल शेळकंदे , उपसभापती अमित ढोले,पं स सदस्या उल्का मोरे व प्रशांत डुंबरे, गणेश कवडे, मा. जि.प.स मोहित ढमाले, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष तुषार थोरात,अनंत चौगुले, उत्तम काशिद, अजित सहाणे, आर डी गोरडे, निलेश चव्हाण,माजी नगराध्यक्ष शाम पांडे, बालाजी गाडेकर, नवज्योत सिंग गाडीवाले, ज्योत्स्ना महाबरे, नगरसेवक नंदकुमार तांबोळी,विकास राऊत, शहरप्रमुख मयूर रोकडे, जितेंद्र बिडवई,संदीप ताजने, अंबादास डोके पोलीस पाटील विक्रम मोरे,के एस ढोमसे , नि पो आ सुभाष मोरे,गुलाब मोरे , ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जि.प.माजी सदस्य सुभाष मोरे , सूत्रसंचालन पत्रकार लक्ष्मण दातखिळे व ऋणनिदेष उपनेते बबन थोरात यांनी व्यक्त केले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे घवघवीत यश



ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील शरदचंद्र पवार इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एमबीए – 2024 Pattern, NEP 2020) विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (SPPU) यांच्या ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर हिवाळी सत्र परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रथम - बेलकर पायल रमेश (SGPA 8.04), द्वितीय - पंडित अशोक प्रल्हाद (SGPA 8.00), तृतीय - गिरी मधुरा संजय (SGPA 7.73) प्रथम - कुमकर तेजस्विनी विलास (SGPA 8.54), द्वितीय - घोलप अपूर्वा आत्माराम (SGPA 8.42), तृतीय - आहुजा लक्ष्मी जीवन, जरे संध्या सुनील, कुलकर्णी श्रीराम चंद्रकांत, कपूर पूजा प्रदीप आणि डुंबरे सागर दत्तात्रय (SGPA 8.31) हे विद्यार्थी संयुक्तरीत्या गुणवंत ठरले. या यशाबद्दल श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विशाल तांबे, सचिव वैभव तांबे, खजिनदार मयूर ढमाले, संचालक डॉ. सुनील लोसारवार, डॉ. रमेश काकड, प्राध्यापक व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### जुन्नर तालुक्यात मतदार यादीचे सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील आपले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदाराच्या नावाची सन- २००२ च्या मतदार यादीशी मॅपिंग करीत आहेत. तसेच मतदार यादीतील अस्पष्ट फोटो, चुकीचे तपशील याची दुरुस्ती करीत आहेत. याबाबत तालुक्यातील सर्व नागरिकांनी आपल्या मतदान केंद्रावर संपर्क साधावा अशी माहिती तहसिलदार जुन्नर तथा सहा मतदार नोंदणी अधिकारी १९५ जुन्नर विधानसभा मतदार संघ यांनी सांगितलेली आहे. आपले नाव २००२ च्या मतदार यादीत शोधण्याकरिता ECINET या ॲपचा वापर करून २००२ मधील मतदार संघ क्रमांक (AC number & name), मतदान केंद्र क्र. (polling station no. and name) व अनुक्रमांक (part serial no.) यांचा तपशील आपल्या मतदान केंद्राचे अधिकारी यांना देऊन आपली मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करा.

# ठाण्यात समता-शिक्षणाचा संदेश; मान्यवरांकडून अभिवादन!



ठाणे : (स. गांवकरी)

समाजात समता, शिक्षण आणि परिवर्तनाचा संदेश देणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ठाणे शहरातील एन.के.टी. ट्रस्ट येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महात्मा फुले यांनी समाजातील वंचित व शोषित घटकांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले करून समतेचा दीप प्रज्वलित केला. त्यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजही समाजाला दिशा देणारे आहे. त्यांच्या विचारांवर चालत समाजात शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हीच त्यांना खरी अभिवादन ठरेल, असे त्यांनी नमूद केले. तसेच युवकांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी पुढे यावे, असे आवाहनही त्यांनी केले. या कार्यक्रमाला उद्योजक व समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला, दैनिक समर्थ गांवकरीचे जिल्हा प्रतिनिधी संतोष पडवळ, राजेंद्र पांडे आदी मान्यवरांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमआयटी एडीटीचा बेंटली सिस्टिम्ससोबत करार

## डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षणासाठी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन' उत्कृष्टता केंद्र सुरू




पुणे : (स. गांवकरी)

एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी एडीटी) आणि जागतिक स्तरावरील इन्फ्रास्ट्रक्चर अभियांत्रिकी सॉफ्टवेअर क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी बेंटली सिस्टिम्स यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याचवेळी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स' या उत्कृष्टता केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. डिजिटल पायाभूत सुविधा शिक्षणाला चालना देणे आणि उद्योग-संलग्न शिक्षण अधिक सक्षम करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्सेस अंतर्गत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमास बेंटली सिस्टिम्सचे दक्षिण आशिया विभागीय कार्यकारी कमलकन्नन तिरुवडी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी शैक्षणिक संचालक हर्ष नागपाल, वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक मोनिका जेधे आणि परमर्थ सैनी हे मान्यवर उपस्थित होते. एमआयटी एडीटी विद्यापीठाकडून कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ. सुनीता कराड, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, तसेच सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. युवराज भिरूड आदी उपस्थित होते. या प्रसंगी 'इन्फ्रास्ट्रक्चर इनोव्हेशन सेंटर ऑफ एक्सलन्स' तसेच बेंटली स्टुडंट क्लबचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, स्मार्ट कन्स्ट्रक्शन तंत्रज्ञान आणि शाश्वत अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रगत शिक्षण व संशोधनाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांना ६५ हून अधिक उद्योगमान्य सॉफ्टवेअर, जागतिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि विशेष तांत्रिक प्रशिक्षण सुविधांचा लाभ मिळणार आहे. प्रमुख पाहुणे कमलकन्नन तिरुवडी यांनी आपल्या भाषणात स्मार्ट शहरीकरणासाठी सॉफ्टवेअर-आधारित बुद्धिमान पायाभूत सुविधांचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. कार्याध्यक्ष व प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड यांनी हा उपक्रम विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील डिजिटल अभियांत्रिकी कौशल्ये प्रदान करणारा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे सांगितले.

# "ज्ञान, पत्रकारिता, समर्पण आणि संस्कारांचा दीपस्तंभ : आदरणीय प्रकाश टाकळकर सर"

(स. गांवकरी)



कासार भाऊसाहेब

जीवनाच्या प्रवासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांची ओळख केवळ त्यांच्या पदांपुरती मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या कार्यातून, विचारांतून आणि माणुसकीतून ते अनेकांच्या जीवनात दीपस्तंभ ठरतात. सत्यनिकेतन शिक्षण संस्था, राजूरचे विश्वस्त, अकोले तालुक्यातील ज्येष्ठ अभ्यासू पत्रकार, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा सल्लागार, अकोले तालुका पत्रकार परिषदेचे विश्वस्त आणि सर्वोदय विद्यामंदिर राजूरचे सेवानिवृत्त प्राचार्य आदरणीय गुरुवर्य प्रकाश टाकळकर सर हे असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे.

प्रकाश टाकळकर सरांनी आपल्या कार्यातून शिक्षण आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रांत एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. शिक्षक म्हणून त्यांनी केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान दिले नाही, तर त्यांच्यात संस्कार, मूल्ये आणि विचारांची दिशा निर्माण केली. त्यांच्या शिकवणीतून अनेक विद्यार्थ्यांनी जीवनाचा योग्य मार्ग निवडला, हेच त्यांच्या कार्याचे खरे यश आहे. सोबतच सर्वोदय विद्यामंदिर या प्रतिष्ठित शाळेचे प्राचार्य पद भूषविताना शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व मुलांच्या गुणवत्ता पूर्ण शिक्षणासाठी त्यांनी घेतलेले कष्ट मेहनत सर्वांना परिचित आहे. पत्रकार म्हणून त्यांनी समाजातील प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य प्रामाणिकपणे आणि निर्भीडपणे केले. त्यांची लेखणी ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती समाजजागृतीचे प्रभावी साधन ठरली आहे. ग्रामीण भागातील समस्या, सामाजिक प्रश्न आणि सामान्य माणसाच्या भावना, अकोले तालुक्यातील आंदोलने, चळवळी त्यांनी आपल्या लेखनातून प्रभावीपणे मांडल्या. अकोले हा पुरोगामी विचारांचा तालुका. येथे शेती, शेतकरी, दुर्बल घटकांतील प्रश्नांवर सातत्याने आंदोलन होत राहिली. भंडारदरा, निळवंडे धरण यावरील अभ्यासपूर्ण व परिवर्तनशील बातम्या सरांनी सातत्याने लिहिल्या. त्यामुळे त्यांची ओळख एक संवेदनशील, जाणकार आणि अभ्यासू पत्रकार म्हणून निर्माण झाली आहे.

त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रेमळपणा, साधेपणा आणि मदतीचा हात पुढे करण्याची वृत्ती यांचे सुंदर मिश्रण आहे. कोणत्याही व्यक्तीला मार्गदर्शन करताना ते कधीही थकत नाहीत. नवोदित लेखक, शिक्षक किंवा पत्रकार यांना ते सदैव प्रेरणा देत राहतात. त्यांच्या सहवासात राहणे म्हणजे एक जिवंत विद्यापीठात शिक्षण घेण्यासारखे आहे. म्हणूनच अनेक जणांचे टाकळकर वाड्यात सतत जाणे येणे असते. अंगी प्रचंड दातृत्व असतानाही त्यांनी ते कधीही समाजामध्ये सांगितले नाही. दाखवले नाही.

म्हणतात ना एका हाताने दान दिले तर ते दुसऱ्या हाताला कळू नये. अगदी अशाच पद्धतीने सरांनी आपल्या वडिलोपार्जित जमिनीचा काही भाग शैक्षणिक सामाजिक कार्यासाठी विना मोबदला दिला आहे. आर्थिकही मोठे योगदान दिले आहे. देत आहेत.

माझ्यासारख्या शिक्षकाला लेखन करताना, पुस्तके लिहिताना त्यांनी दिलेले मार्गदर्शन अमूल्य आहे. प्रत्येक वेळी त्यांनी दिलेली दिशा, प्रोत्साहन आणि सुधारणा यामुळे माझ्या लेखनाला एक नवा आयाम मिळाला. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा लाभ मला सातत्याने मिळत आहे, ही माझ्यासाठी आणि आणखीही शिक्षक मित्रांसाठी अभिमानाची आणि भाग्याची गोष्ट आहे.

ज्ञानदीप ही आम्ही शिक्षक मित्रांनी सुरू केलेली संस्था. स्थापनेपासूनच सर मार्गदर्शक आणि सल्लागाराची भूमिका बजावतात म्हणूनच शाळांमध्ये गरजू मुलांसाठी तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आम्ही काम करत राहिलो आणि सध्याही जोमाने काम करत आहोत. यामागे सरांचे मार्गदर्शन मोलाचे आहे.

आज आपला वाढदिवस. आपल्या कार्याला आणि व्यक्तिमत्त्वाला मानाचा मुजरा करताना मन कृतज्ञतेने भरून येते. आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजासाठी, शिक्षणासाठी आणि पत्रकारितेसाठी प्रेरणादायी ठरत राहो, हीच प्रार्थना.

**आदरणीय टाकळकर सरांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! आपण निरोगी, दीर्घायुषी राहून आपल्या ज्ञानदीपातून अनेकांना प्रकाश देत राहा, हीच सदिच्छा.**

**Adarsh Shikshan Vikas Mandal's**
**BHIMASHANKAR AYURVED COLLEGE**
At/P- Wadgaon Kashimbeg (Walunjwadi), Manchar-Ghodegaon Road, Tal-Ambegaon, Dist.- Pune, 410503 E-mail: adarshshikshanvikasmandal@gmail.com
Website: www.bhimashankarayurvedcollege.edu.in Phone: 7517252525 / 7517232323

**WALK IN INTERVIEW**

Walk in interview arranged on 18/04/2026. Applications are invited on plain paper along with all necessary certificates from eligible candidates for the following posts. Qualifications and experience as per NCISM and MUHS norms and university direction 01/2017.

| Sr. No. | Subject | Professor | Associate Professor | Assistant Professor |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | 01 (OPEN) | | |
| 2 | Samhita Siddhant | Not to be filled | Not to be filled | 1. Not to be filled 2. 01 (SC) |
| 3 | Sanskrit | Not to be filled | Not to be filled | Not to be filled |
| 4 | Rachana Sharir | 01 (OPEN) | Not to be filled | Not to be filled |
| 5 | Kriyasharir | Not to be filled | 01 (OPEN)# | Not to be filled |
| 6 | Dravyaguna | Not to be filled | 01 (OPEN)# | Not to be filled |
| 7 | Rasa Shastra evum Bhaishajya Kalpana | 01 (OPEN) | Not to be filled | Not to be filled |
| 8 | Rognidan | Not to be filled | 01 (OPEN)# | Not to be filled |
| 9 | Swasthavritta | 01 (OPEN) | Not to be filled | 01 (OPEN) |
| 10 | Agad Tantra evum Vidhi Vaidyaka | 01 (OPEN) | Not to be filled | 01 (OPEN) |
| 11 | Strirog Prasuti Tantra | Not to be filled | Not to be filled | 1. Not to be filled 2. 01 (SC) |
| 12 | Kayachikitsa | Not to be filled | 01 (OPEN) | Not to be filled |
| 13 | Shalyatantra | Not to be filled | 01 (OPEN) | 1. Not to be filled 2. 01 (SC) |
| 14 | Shalakyatantra | 01 (OPEN)# | Not to be filled | 1. Not to be filled 2. 01 (SC) |
| 15 | Balrog | Not to be filled | 01 (OPEN) 01 (SC)# | 1. Not to be filled 2. 01 (SC) |
| 16 | Panchakarma | 01 (OPEN)# | Not to be filled | 1. Not to be filled 2. 01 (SC) |

Notes : Candidates should present with all Original Documents. No TA / DA is provided. # Indicates Additional Post.
Interview Date: 18/04/2026, 10 am onwards.
Venue : College Office.
**President Principal Secretary**
Bhimashankar Ayurved College,
Wadgaon Kashimbeg, (Walunjwadi), Tal Ambegaon, Dist Pune

# केळी उत्पादकांच्या घामाला न्याय कधी?

## उत्पादक शेतकऱ्यांची अर्तहाक

रावेर : (स. गांवकरी)

जळगाव जिल्हा केळी उत्पादनाचा कणा मानला जातो. रावेर, यावल आणि मुक्ताईनगर या तालुक्यांमध्ये सध्या केळी काढणीचा हंगाम बहरात आहे. वर्षभराचा घाम, कर्जाचा भार आणि निसर्गाशी झुंज देत उभा केलेला केळी माल बाजारात येतो, तेव्हा शेतकऱ्यांच्या अपेक्षा फार मोठ्या नसतात—फक्त कष्टाचा न्याय्य मोबदला. परंतु वास्तव मात्र या अपेक्षांना छेद देणारे आहे.

दरनिर्धारणाची जबाबदारी स्थानिक बाजार समित्यांकडे असताना, प्रत्यक्षात केळीचे दर बऱ्हाणपूर येथील बाजाराच्या परच्यांवर ठरवले जातात. ही बाब केवळ तांत्रिक विसंगती म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही . उलट ती स्थानिक व्यवस्थेतील कमकुवतपणा आणि जबाबदारीपासून दूर पळण्याची प्रवृत्ती अधोरेखित करते. स्थानिक बाजारपेठ अस्तित्वात असूनही बाहेरील दरांचा आधार घेणे, हे



शेतकऱ्यांच्या हिताला बाधक ठरणारे आहे. विशेष म्हणजे, जवळच असलेल्या मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूरमध्ये सध्या दर्जेदार केळीचे उत्पादन नसतानाही, त्या बाजारातील मध्यम दर्जाच्या मालाचे दर इथे लागू केले जात आहेत. परिणामी, जळगाव जिल्ह्यातील उच्च प्रतीच्या केळीला अपेक्षित दर मिळत नाहीत. बाजारातील या विसंगतीमुळे गुणवत्तेचा योग्य सन्मान होत नाही, आणि शेतकऱ्यांचा तोटा वाढतो.

आज चांगल्या प्रतीच्या केळीला ३०० ते ६०० रुपयांदरम्यान भाव मिळत असल्याची स्थिती आहे. उत्पादन खर्चाचा विचार करता हा दर तोट्याचा ठरतो. खत, मजुरी, वाहतूक आणि इतर खर्च सातत्याने वाढत असताना, उत्पन्न घटत आहे. यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत अडकत चालला आहे. उत्पादन वाढवूनही उत्पन्नात वाढ होत नाही, ही स्थिती दीर्घकाळ टिकली तर शेतीकडे पाठ फिरवण्याची वेळ येऊ शकते. या पार्श्वभूमीवर स्थानिक बाजार समित्यांची भूमिका अधिक जबाबदारीची ठरते. शेतकऱ्यांच्या हितासाठी स्थापन झालेल्या या संस्था जर दरनिर्धारणात सक्रिय राहिल्या नाहीत, तर त्यांचे अस्तित्व केवळ औपचारिक राहते. व्यापाऱ्यांच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे, पारदर्शकता सुनिश्चित करणे आणि शेतकऱ्यांना न्याय्य दर मिळवून देणे—ही त्यांची मूलभूत कर्तव्ये आहेत.



खारघर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर साहेब यांना दैनिक समर्थ गावकरी 2026 ची डायरी तसेच दैनिक समर्थ गावकरीची प्रत पेन आणि किचन देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...



### ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात कुस्ती मल्लांची निवड चाचणी

राजूर (स. गांवकरी) : भारतीय खेल प्राधिकरण नवी दिल्ली यांचे वतीने दि.२४ एप्रिल २०२६ रोजी राजूर येथील सत्यनिकेतन चे ॲड.एम. एन.देशमुख महाविद्यालयात १४ वर्षाखालील कुस्ती मल्लांची निवड चाचणी संपन्न होणार आहे.या निवड चाचणीसाठी दिल्लीहून तज्ञ कुस्ती कोच मा.श्री भोलानाथ पाल निवड चाचणी घेण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी दिली आहे. या निवड चाचणी मध्ये जे कुस्ती मल्ल निवडले जातील त्यांना दरमहा रु.१००० मानधन व दरवर्षी स्पोर्ट्स किट देण्यात येणार आहे.व राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेसाठी जाण्याचा प्रवास खर्च मिळणार आहे .तसेच या निवड झालेल्या कुस्ती मल्लांना साई कुस्ती केंद्राचे कोच आंतरराष्ट्रीय पदक विजेते तानाजी नरके सर यांच्याकडून कुस्ती प्रशिक्षण मिळणार आहे, तरी अकोले व संगमनेर तालुका परिसरातील सर्व कुस्ती मल्लांनी या निवड चाचणीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.व या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य प्रोफेसर डॉ.भाऊसाहेब देशमूख व जिमखाना विभाग प्रमुख प्रा. व्ही. बी नवले यांनी केले आहे.

### अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे वतीने महात्मा फुले यांना अभिवादन



अहिल्यानगर (स. गांवकरी) : महात्मा ज्योतिबा फुले हे १९व्या शतकातील थोर समाजसुधारक, विचारवंत आणि क्रांतिकारक होते. १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा सुरू केली. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या पहिल्या स्त्री शिक्षिका बनल्या. २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाज स्थापन केला. जातिभेद आणि अंधश्रद्धा यांच्या विरोधात जनजागृती केली.अस्पृश्यता आणि जातिव्यवस्थेविरुद्ध प्रखर लढा दिला,पाण्याचे हौद सर्वांसाठी खुले केले,विधवा व अनाथांसाठी कार्य केले.महात्मा फुलेंनी सत्य हाच एक धर्म हा विचार मांडला.असे प्रतिपादन अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे महानगर जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे यांनी केले आहे. माळीवाडा येथे थोर समाज सुधारक महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने त्यांच्या पुतळ्याचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी आखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्षअंबादास गारुडकर, प्रदेश चिटणीस अनिल निकम, महानगर कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे,महानगर जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे ,देवेंद्र दुधाले, कैलास फुलसौंदर,शंकर आव्हाड,रमेश चिपाडे,शामराव व्यवहारे,मंगेश खंगले,साहेबराव विधाते,शुभम आव्हाड,रोहित व्यवहारे,स्वप्निल राऊत, अविनाश ताठे,नारायण इवळे,पंडित औसरकर,कपिल सुडके,विनोद पुंड,रामभाऊ व्यवहारे,वैभव गोरे,सुनील अक्साळ,नितीन यंदे,अमृत क्षीरसागर आदी उपस्थित होते.

### थोर समाज सुधारक महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : थोर समाज सुधारक महात्मा फुले यांनी सर्व समाजाला शिक्षणाची द्वारे खुली केले आहेत.महात्मा फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली. महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षणाचा वारसा पुढे चालवण्यासाठी प्रेरणा दिली. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शिक्षणाच्या चळवळीमुळेच आज सर्व समाज शिक्षित झाला आहे.तसेच चूल आणि मूल या संकल्पनेतून महिलांना बाहेर पडता आले.त्यामुळेच आज देशाच्या पंतप्रधान, राष्ट्रपती, खासदार,आमदार, सरपंच या सर्वोच्च पदापर्यंत महिला पोहोचले आहेत.महात्मा फुले ही सर्व समाजाचे दैवत आहे. असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे नेप्ती विभाग अध्यक्ष रामदास फुले यांनी केले आहे.




ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर असलेल्या महात्मा फुले विचार प्रबोधन कट्टा येथे महात्मा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रसंगी खासदार नरेश म्हस्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## एन के टी कला व वाणिज्य महाविद्यालयात समारंभ संपन्न




ठाणे : (स. गांवकरी)

टी. जे. एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष समाजरत्न शेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या उपस्थित एन के टी कला व वाणिज्य महाविद्यालयात पदवीदान समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप एम. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून विद्यार्थ्यांच्या परिश्रमांचे कौतुक केले तसेच सुशिक्षित नागरिक म्हणून त्यांची जबाबदारी अधोरेखित केली. प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले. प्रमुख अतिथी प्रा. विजय जोशी यांनी आपल्या भाषणातून बदलत्या काळाशी जुळवून घेणे, नैतिक मूल्ये आणि आयुष्यभर शिक्षणाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. मंचावर उपप्राचार्य डॉ. मनोशी बागची, आयक्यूएसी समन्वयक डॉ. हिमांशी मन्सुखानी, पदव्युत्तर परीक्षा समन्वयक डॉ. पल्लवी शाह, पदवी परीक्षा समन्वयक श्री. नितीन वराडे तसेच सेल्फ फायनान्स अभ्यासक्रम समन्वयक डॉ. योगेश्वरी पाटील उपस्थित होते. समारंभाचा मुख्य आकर्षण म्हणजे पदवी वितरण सोहळा होय. यावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली व टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव करण्यात आला. काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत महाविद्यालय व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप श्री नितीन वराडे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. हा दीक्षांत समारंभ महाविद्यालयाच्या सर्वांगीण शिक्षणाच्या बांधिलकीचा आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीच्या वाटचालीचा अभिमानास्पद पुरावा ठरला.

## रावेरला ज्योतिबा फुले जयंती साजरी

रावेर : (स. गांवकरी)

रावेरला श्रीहरी फर्टीलायझर छोरिया मार्केट रावेर येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची 200 वी जयंती निमीत्त महात्मा ज्योतीबा फुले ज्ञानज्योती सावित्री आई फुले संत सावता महाराज छत्रपती शिवाजी महाराज भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमा पुजन श्री माळी समाज मा.अध्यक्ष श्री संजय विठ्ठल महाजन ,माळी समाज अध्यक्ष व नगर सेवक नितीन भगवान महाजन ,भाजपा तालुका उपाध्यक्ष योगेश पंडीत महाजन यांचे हस्ते प्रतिमा पुजन झाले या प्रसंगी श्री पंडीत शंकर महाजन माळी समाज पंच मंडल सदस्य, श्री गणेश भाऊ महाजन ओम बूट हाऊस रावेर श्री जितेंद्र भाऊ महाजन मंगलमूर्ती अँग्रो श्री जिवन महाजन, कैलास महाजन ,श्री संजय भाऊ भोई ,शेख सलीम



शेख बशीर, विजय पाटील सखी श्रृंगार दिपक चौधरी वाघोड श्री म्हसाणे दादा, श्री हिरामण बारीश्री प्रकाश भाऊ सैतवाल व श्रीहरी फर्टिलायझर संचालक मी स्वतः श्री मनोज दत्तात्रय पाटील श्री दत्तात्रय हरी पाटील आदी उपस्थित होते.

## जायनावाडीत पेसा कायदा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

एकदरे : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील जायनावाडी येथे पेसा कायदा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.प्रमुख उपस्थिती म्हणून तालुका पेसा व्यवस्थापक बन्या बापू सहाणे,स्वच्छ भारत समुह समन्वयक अशोक कडलग यांच्या मार्गदर्शनाखाली हा शिबिर घेण्यात आला.२४ डिसेंबर १९९६ रोजी लागू झालेला एक ऐतिहासिक कायदा आहे,जो भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी समुदायांना स्वशासनाचे अधिकार देतो.हा कायदा ग्रामसभेला केंद्रस्थानी ठेवून जमीन,पाणी,वनसंपदा आणि स्थानिक संस्कृतीचे संरक्षण करण्याचे अधिकार आदिवासींना देतो यावेळी पेसा व वनहक्क कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.ग्रामसभेचे वैधानिक अधिकार व जबाबदाऱ्या यांची माहिती वनहक्क दावे सादर करण्याची प्रक्रिया अनुसूचित क्षेत्रातील नागरिकांचे हक्क व शासनाच्या योजनांची तसेच शंका निरसन व प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले.

गावागावात पेसा कायदा अमलात आला पायजे.असे बोलताना सांगितले.स्वच्छ भारत मिशन गावागावात सार्वजनिक तसेच वयक्तिक शौचालय बांधले पायजे. शासनाकडून भरपूर प्रमाणात योजना दिलेल्या असतात त्या योजना आपण आपल्या गावात राबवल्या पायजे.अशी माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी उपस्थित ग्रामविकास अधिकारी विशाल धांडे,पेसा व्यवस्थापक बन्या बापू सहाणे, स्वच्छ भारत समुह समन्वयक अशोक कडलग,पेसा अध्यक्ष काळू भांगरे,सोमनाथ भांगरे,राजू भांगरे, भांगरे,पांडुरंग भांगरे,तसेच सी आर पी कावेरी भांगरे,अंगणवाडी सेविका अलका भांगरे,तसेच गावातील सर्व महिला ग्रामस्थ उपस्थित होते.शेवटी गोरख भांगरे यांनी आभार मानले.

## महात्मा फुले यांना द्विशताब्दी जयंती वर्षातच 'भारतरत्न' मिळावा यासाठी विशेष आग्रह धरणार: खा. ज्योती वाघमारे

पुणे : (स. गांवकरी)

"क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' मरणोत्तर प्रदान करण्यात यावा, यासाठी केंद्र सरकारकडे विशेष आग्रह धरला जाईल," अशी ग्वाही खासदार ज्योती वाघमारे यांनी आज येथे दिली.

महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित अभिवादन सभेत त्या बोलत होत्या. या प्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे खासदार ज्योती वाघमारे यांनी स्वतः महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित एक प्रेरणादायी गीत सादर केले. त्यांच्या सुश्राव्य आवाजातील या गीताने उपस्थित सर्वांची मने जिंकली आणि सभागृहात चैतन्य निर्माण झाले.



लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी सांभाळतानाच कलेच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केलेल्या आदरांजलीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी महत्त्वपूर्ण घोषणा केली. ते म्हणाले की, "पुणे ही महात्मा फुलेंची कर्मभूमी आहे. त्यामुळे पुढील वर्षी महात्मा फुले यांची देशातील सर्वात मोठी आणि भव्य जयंती पुणे शहरात साजरी केली जाईल. महापालिकेच्या माध्यमातून यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल."

द्विशताब्दी महोत्सव समितीचे मुख्य निमंत्रक राहुल डंबाळे यांनी समितीच्या आगामी रूपरेषेबद्दल माहिती दिली. "महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी समितीच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाला सोलापूर येथील सामाजिक कार्यकर्ते विश्वास गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते अंजूम इनामदार, शिवसेनेचे मिलिंद आहिरे, विठ्ठल गायकवाड, अशोक दिलपाक, राहुल नागटिळक यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी महात्मा फुले यांच्या कार्याचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा जागर करण्याचा निर्धार व्यक्त केला.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)